# MT

Seat No. | | | | | | | |

2018 .... .... 1100

MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - SEMI PRELIM - II - PAPER - I

**Time : 3 Hours** **(Model Answer Paper)** **Max. Marks : 100**

विभाग १ – गद्य

उ.१ अ. **खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) (i) **कृती पूर्ण करा.** 1

शनिवार पेठेशी संबंधित वस्तू
- ओंकारेश्वर मंदिर
- पूल
- कट्टा

(ii) **एका शब्दात उत्तर लिहा.** 1

लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले ते साल. – २००४

(२) (i) **कंसातील योग्य पर्याय निवडून रिकामी जागा भरा.** 1

त्याने थरथरत्या हातांनी मला **नमस्कार** केला.

(ii) **चूक की बरोबर ते लिहा.** 1

लेखकांनी सर्व शालींचे गाठोडे बांधून मित्राकडे दिले. - **बरोबर**

(३) **व्याकरण :**

(i) **समानार्थी शब्द लिहा.** 1

(i) कष्टकरी – **श्रमिक** (ii) कर – **हात**

(ii) **कंसातील शब्दाला योग्य विभक्ती प्रत्यय लावून वाक्य पुन्हा लिहा.** 1

तत्कालीन एक-दोन वर्षात माझ्यावर **शालींचा** वर्षाव झाला.

(४) **स्वमत :** 2

मानवाच्या तीन मुलभूत गरजा - अन्न, वस्त्र, निवारा. या पाठातील भिक्षेकऱ्याकडे या तिन्ही गोष्टी नव्हत्या. निवारा म्हणजे राहायला घर नव्हते म्हणून तो ओंकारेश्वर मंदिराबाहेर भिक्षा मागत होता. थंडीत कुडकुडताना पाहिल्यावर लेखकाला त्याची दया आली व त्याने त्याचे थंडीपासून संरक्षण व्हावे म्हणून

आपल्याजवळील एक नाही तर दोन शाली दिल्या. पण दोन दिवसापासून भुकेला असलेल्या भिक्षेकऱ्याने शाली विकून आपल्या पोटाची आग विझवली, भूक शांत केली. माणूस श्रीमंत असो की गरीब त्याला जगण्यासाठी अन्नाची आवश्यकता असतेच. एक वेळ कपडे नसतील, निवारा नसेल तर चालवून घेईल; पण वेळेला खायला हे मिळालेच पाहिजे आणि त्यामुळे भिक्षेकऱ्याने शाली विकून आपल्या पोटाची आग शांत केली हे माझ्या मते योग्यच आहे.

उ.१ **आ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) (i) **एका वाक्यात उत्तर लिहा.** 1

लेखकाच्या गिरगावातल्या शाळेचे नाव 'युनियन हायस्कूल' असे होते.

(ii) **आकृतिबंध पूर्ण करा.** 1




(२) **योग्य पर्याय शोधून रिकाम्या जागा भरा.** 2

(i) आमचे मूळ गाव <u>**दक्षिण**</u> गोव्यातील माशेल.

(ii) मी आणि माझी आई <u>**मुंबईत**</u> येऊन पोहोचलो.

(३) **व्याकरण :**

(i) **खालील नामाचे लिंग बदलून वाक्य पुन्हा लिहा.** 1

इथल्या <u>शिक्षिका</u> मात्र मनानं खूप श्रीमंत होत्या.

(ii) **अधोरेखित शब्दाची जात ओळखा.** 1

वर = शब्दयोगी अव्यय

(४) **स्वमत :** 2

वयाच्या ६व्या वर्षी लेखकाचे वडील वारले म्हणून त्यांच्या आईला व त्यांना माशेल सोडून मुंबईला यावे लागले. त्यांची आर्थिक परिस्थिती पूर्ण खालावलेली होती. शिक्षण घेण्यासाठी लेखक खूप उत्सुक होते. पण फी भरणे शक्य नसल्यामुळे आपण शाळेत जाऊ शकू की नाही असे त्यांना वाटत असे.

उ.१ **इ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **कृती पूर्ण करा.** 2

(i)



(ii)

| सर्व मानवांना परमेश्वराने दिलेले स्वातंत्र्य | |
|---|---|
| धार्मिक | राजकीय |

(२) **उत्तरे लिहा.** 2

(i) सर्वांना ऐहिक जीवनाचा, विश्वातील वस्तूंचा यथेच्छ उपभोग घेणे.

(ii) शेतकी, कला-कौशल्य, मजुरी.

(३) **व्याकरण :**

**खालील तक्ता पूर्ण करा.** 2

| शब्द | मूळशब्द | प्रत्यय | सामान्यरूप |
|---|---|---|---|
| परमेश्वराने | परमेश्वर | ने | परमेश्वरा |
| मानवांना | मानव | ना | मानवां |

(४) **स्वमत :** 2

संविधानाने भारतातील प्रत्येक नागरिकास स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, राष्ट्रप्रेम इत्यादी हक्क दिले आहेत. मनुष्याने त्या हक्कांचा वापर स्वत:चा स्वार्थ पूर्ण करून घेण्यासाठी करू नये. आपल्या हक्कांचा वापर करून कोणाचे नुकसान करू नये. भारतदेशाची अखंडता टिकावी, धार्मिक सलोखा अखंड राहावा, सर्वांनी समाधानाने आणि एकत्वाने येथे नांदावे अशा करीता आपल्या हक्काचा वापर मनुष्याने करावा. मनुष्याला सुख प्राप्त व्हावे. कोणावरही अन्याय होऊ नये, प्रत्येकाच्या गरजा भागाव्यात, प्रत्येकाला समान वागणूक मिळावी यासाठीच तर भारतीय राज्य घटनेने आपल्याला समान हक्क दिले आहेत. त्या हक्कांची पायमल्ली होणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी. एक सुजाण, जबाबदार नागरिक बनावे.

## विभाग २ – पद्य

प्र.२ **अ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **चौकट पूर्ण करा.** 2

(i) संत नामदेव कोणाचे दास - श्री विठ्ठलाचे

(ii) संत नामदेव कोणाला धावून यायला सांगतात - श्री विठ्ठलाला

(iii) मेघांची विनवणी करणारा - चातक

(iv) पाडसासाठी चिंतित असणारी - हरिणी

| | | |
|---|---|---|
| (२) | **खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**<br>**(i)** बाळाला वाचवण्यासाठी माता धावून येते.<br>**(ii)** भुकेल्या वासराला पाहून धेनू (गाय) हंबरत धावून येते. | **2** |
| (३) | या जगात (विश्वात) आपल्या मुलाबाळांपेक्षा मातेला कोणीही महत्त्वाचे नसते. आपल्या मुलापुढे मातेला दुसऱ्या सर्व गोष्टी गौण वाटतात. आई आपल्या मुलांच्या सुखातच आपले सुख मानत असते. आई आपल्या अपत्यासाठी काहीही करू शकते. मग ती आई प्राणी, पशु किंवा पक्षी कोणीही असू द्या. संत नामदेव महाराज सांगतात की, आपले बाळ आगीत सापडले तर, त्या बाळाची आई व्याकूळ होऊन त्याला आगीतून वाचवण्यासाठी धावून जाते. घरट्यातून पिल्लू जमिनीवर पडले तर पक्षिणी त्यासाठी तत्परतेने जमिनीकडे झेपावते. भूकेल्या वासराला पाहून गाय हंबरून त्याच्याकडे धाव घेते. जंगलातल्या वणव्यात सापडलेल्या पाडसाला वाचवण्यासाठी हरिणी चिंतीत होते. त्याचप्रमाणे नामदेवांना वाटते, मी सर्वस्वी तुझा (विठ्ठलाचा) अंकित आहे. तेव्हा माझ्या आईने (विठ्ठल) माझ्या प्रत्येक कार्यात तत्परतेने धावून यावे. | **2** |
| (४) | **खालील काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य स्पष्ट करा.**<br>वारकरी संप्रदायाचे महान प्रचारक संत नामदेव महाराज अगदी मनापासून आर्तपणे विठ्ठलाचा धावा करतात. त्यासाठी ते अतिशय समर्पक दृष्टान्त देतात. ते म्हणतात की, ज्याप्रमाणे नजरचुकीने अग्नित सापडलेल्या बाळाला वाचवण्यासाठी त्याची आई व्याकूळ होऊन , काळजीने त्याच्याजवळ धावून जाते. त्याला मायेने, प्रेमाने उचलून घेते. त्याचप्रमाणे हे प्रभू, विठ्ठला, मी पूर्णपणे तुझा अंकित आहे. मी तुझा दास, सेवक आहे. आईप्रमाणे तुम्ही माझ्या अडचणीत, माझ्या कार्यात व्याकूळ होऊन धावत यावेस. | **2** |
| उ.२<br>(i) | **आ. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी पुढील कृती सोडवा :**<br>**योगी सर्वकाळ सुखदाता** | |
| (१) | **कवी/कवयित्री : –**<br>संत एकनाथ | **1** |
| (२) | **कवितेचा रचनाप्रकार : –**<br>'योगी सर्वकाळ सुखदाता' ही कविता एक 'अभंग' आहे. | **1** |
| (३) | **कवितेचा काव्यसंग्रह : –**<br>'योगी सर्वकाळ सुखदाता' हा अभंग 'एकनाथी भागवत' शासकीय प्रत' या संग्रहातून घेतला आहे. | **1** |
| (४) | **कवितेचा विषय : –**<br>योगी पुरूषाचे समाजातील सामाजिक कार्य समजावून देणारा आणि त्याचे श्रेष्ठतत्त्व स्पष्ट करणारा 'योगी सर्वकाळ सुखदाता' हा एक सुंदर अभंग आहे. | **1** |

| | | |
|---|---|---|
| (५) | **कवी/कवयित्रीची लेखन वैशिष्ट्ये : –**<br>मनातील भाव सहज व्यक्त होईल असा 'अभंग' हा मराठीचा जुना पूर्वापार चालत आलेला छंद कवितेसाठी योजला आहे. या अभंगातून शांतरस दिसून येतो. कवीची भाषाशैली अत्यंत रसाळ असून चित्रदर्शी आहे. पाण्याची आणि योगी पुरूषाची तुलना करताना मळ, निर्मळ, एकवेळ, सर्वकाळ असे शब्द वापरून छान यमक साधले आहे. कवीच्या भाषिक वैशिष्ट्यात येणे, पावणे, कीर्तने, निजज्ञाने या शब्दांमुळे नादमाधुर्य निर्माण झाले आहे. | 2 |
| (६) | **मध्यवर्ती कल्पना : –**<br>पाणी तहान शमवते व काही काळापुरते संतुष्टी देते. पाण्यामुळे शेतीतून अन्नधान्य मिळते. भूक भागवणे, तहान शमवणे, मळ घालवणे, स्वच्छता करणे हे पाण्याचे काये आहे. अशा या पाण्याची तुलना संत एकनाथांनी योगी पुरूषाबरोबर केली आहे. योगी ज्ञानादान करून सर्वेंद्रिय तृप्त करतात. योगी इहलोकात जन्म घेऊन सर्व लोकांना कीर्तन-प्रबोधनाद्वारे आत्मज्ञानाचे निरंतर सुख देतात. योगी पुरूष व पाणी दोघेही समाजासाठी अमूल्य आहेत. | 2 |
| **(ii)** | **दोन दिवस** | |
| (१) | **कवी/कवयित्री : –**<br>नारायण सुर्वे | 1 |
| (२) | **कवितेचा रचनाप्रकार : –**<br>'दोन दिवस' या कवितेचा रचनाप्रकार 'मुक्तछंद' हा आहे. | 1 |
| (३) | **कवितेचा काव्यसंग्रह : –**<br>'दोन दिवस' ही कविता 'ऐसा गा मी ब्रह्म!' या काव्यसंग्रहातून घेतली आहे. | 1 |
| (४) | **कवितेचा विषय : –**<br>कवी नारायण सुर्वे यांनी आपल्या जीवनसंघर्षाचे चित्रण करत असताना नकळतपणे आपल्या आजूबाजूच्या कष्टकरी, कामगार, श्रमिक, गरीब जनतेचा जगण्यासाठीचा संघर्ष दाखवून दिला आहे. सुख-दु:ख पचवून जगण्याची शिकवण देणारी 'दोन दिवस' ही कविता एक उत्तम 'सामाजिक कविता' आहे. | 1 |
| (५) | **कवी/कवयित्रीची लेखन वैशिष्ट्ये : –**<br>मराठी भाषेतील 'मुक्तछंद' हा काव्यप्रकार कवीने वापरला आहे. या कवितेतून 'करूण रस' दिसून येतो. साधे शब्द, सोपी भाषा पण सशक्त विचार, सत्यकथन, गद्य-पद्य अशा अंगाने जाणारी कवी नारायण सुर्वे यांची कविता आहे. आपल्या आयुष्याच्या संघर्षमय जीवनाचे वर्णन करण्यासाठी कवीने झोतभट्टी आणि पोलाद या दोन प्रतिमांचा खूप छान वापर केलेला आहे. नारायण सुर्वे यांनी सामान्य माणसांच्या दु:खाला, संवेदनेला साध्या पण चपखल शब्दात गुंफून कवितेला एका विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवले आहे. खरे तर चंद्र, चांदणे एखाद्या कवीसाठी सृजनशीलतेची प्रतिकं; पण नारायण सुर्वेनी त्यांना आपल्या जीवनवास्तवाशी जोडले. | 2 |

| | | |
|---|---|---|
| (६) | **मध्यवर्ती कल्पना : –**<br>'दोन दिवस' या कवितेतून कवी नारायण सुर्वे यांनी 'दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले' असे जीवनाचे वास्तव चित्र रेखाटताना 'भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली' असे भीषण जीवनसत्य मांडले आहे. हे जीवनसत्य मांडताना जगाच्या या शाळेत दु:ख पचवून जगण्याची शिकवण आपल्याला मिळाल्याचे ते सूचित करतात. | 2 |
| उ.२<br>(१) | **इ. खालील ओळींचे रसग्रहण करा.**<br>वरील काव्यपंक्ती 'योगी सर्वकाळ सुखदाता' या अभंगातल्या आहेत. येथे संत एकनाथ यांनी योग्यांची महानता पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे हे सिद्ध केले आहे.<br>पाण्यापेक्षाही योगी पुरुषाचे श्रेष्ठत्व स्पष्ट करताना एकनाथ महाराज म्हणतात की, पाण्याचा गोडवा जिभेला कळतो. तो जिभेपुरता मर्यादित असतो. परंतु योग्याच्या सहवासाने लाभलेले माधुर्य मनुष्याच्या सर्वच इंद्रियांना संतुष्ट करते. मानवी मनातील कटुता नष्ट होऊन मनाला एक आंतरिक समाधान लाभते ते चिरकाल टिकणारे असते.<br>मधुरता व गोडपण यांचा साम्यता दर्शवून योगी हे किती श्रेष्ठ आहे हे खुबीने दाखवून काव्यसौंदर्य निर्माण झाले आहे. कवीची भाषाशैली साधी पण अर्थपूर्ण आहे.येथे शांत रसाचा प्रत्यय येतो. | 4 |
| | **विभाग ३ – स्थूलवाचन** | |
| उ.३.<br>(१) | **खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.**<br>लेखक ट्रेनिंग स्कूलमधील प्रशिक्षण संपवून बार्कमध्ये इंजिनियर म्हणून जॉईन झाले. तेव्हा तिथे मेटलायझिंग प्रक्रियेवर काम करायला त्यांना सांगण्यात आले. त्यासाठी लागणारी सामग्री तिथे होती, पण आतापर्यंत ती कोणीही वापरलेली नव्हती. त्यामुळे लेखक म्हणाले की, ते काम करण्यास तयार आहेत, केवळ त्यांना मदतीसाठी एक वेल्डर आणि एक फोरमनची गरज आहे. त्यावेळी त्यांना नकार देण्यात आला. आपल्याला स्वत:लाच सगळे करावे लागेल असेही सांगण्यात आले. वरिष्ठांची आज्ञा म्हणून लेखकाने सुरुवात केली. बरीच धडपड करून लेखकाने ते काम पूर्ण केले. मग वरिष्ठांकडून या कार्यक्रमाची व्याप्ती वाढवण्यात आली. 'हे करूया, ते करूया', असे बरेच काही काही बोलले गेले. नंतर वरिष्ठांनी लेखकाला विचारले की, ''आता सांग, तुला काय काय पाहिजे ? तुला वेल्डर मिळेल, फोरमन मिळेल, आणखी काही हवे असेल तर तेही मिळेल.'' त्यावेळी लेखक म्हणाले की, ''मला आता काहीच नको. मी स्वत: सगळे काम करीन.'' त्यावेळी लेखकाला सांगण्यात आले की, काम सुरू करण्याआधीच लोक वेगवेगळ्या मागण्या करतात आणि त्यांच्या या वृत्तीमुळेच मेटलायझिंग प्रक्रियेवर काम अजिबात झालेले नव्हते. स्वत:ला काम करता येत नसताना दुसऱ्यांवर काम ढकलण्याच्या प्रक्रियेमुळेच मेटलायझिंग प्रक्रियेवर काम सुरू झालेले नव्हते, असे मला वाटते. | 3 |
| (२) | 'बार्क' हे 'भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर' म्हणजे 'भाभा अणुसंशोधन केंद्र' या नावाचे लघुरूप आहे. डॉ. होमी भाभा यांनी भारतातील अणुसंशोधनाचा पाया घातला. त्यांची आठवण म्हणून त्यांचे नाव या संस्थेला दिलेले आहे. ही संस्था आता प्रचंड मोठी झालेली आहे. अणुसंशोधनाच्या क्षेत्रात कार्य करू पाहणाऱ्या अनेक नवीन मुलांना तिथे कार्य करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते. अनेक मुले इथल्या ट्रेनिंग स्कूलमध्ये संशोधन करत असतात. योग्य प्रशिक्षण घेऊन स्वत:ला सक्षम करून स्वत:चे मार्ग शोधून पुढे जातात, आपले उज्ज्वल भविष्य घडवत असतात. | 3 |

(३) पणती म्हणजे अदम्य विश्वासाचे आणि साहसाचे प्रतिक आहे. वास्तविक पाहता सूर्य म्हणजे प्रकाशाचा लखलखता स्रोत, अनंत पसरलेल्या विश्वाला उजळून टाकण्याचे सामर्थ्य असलेला; म्हणून त्याच्या विनवणीला उत्तर देण्याचे धाडस कोणी करत नाही; पण साधी मातीची पणती पुढे येते आणि नम्रपणाने म्हणते, "हे स्वामी, तेजोमय भास्करा, तुझ्याएवढा धगधगता प्रकाश माझ्याकडे नाही, पण जमेल तसा या पृथ्वीवरील अंधार दूर करण्याचा मी प्रयत्न करीन." आपल्याकडे जे काही चांगलं आहे. ते आपण दुसऱ्याला देऊ शकतो. इतरांची मदत करू शकतो असा विचार करून प्रत्येकाने आपल्या जीवनात काहीतरी सकारात्मक कार्य करावे. पणतीच्या उदाहरणातून हाच विचार कवी रविंद्रनाथांनी व्यक्त केलेला आहे. पणतीच्या प्रकाशाने सगळा अंधार जरी दूर होणार नसला तरी दहा पावलांची वाट ती नक्कीच उजळू शकते, हा विश्वास पणतीच्या ठिकाणी दिसतो. म्हणजेच प्रत्येकाने आपली समता जाणून चांगले कार्य करावे. जे नाही त्याचा विचार न करताजे आपल्याजवळ आहे मग ते थोडं, थोडच का असेना त्याचाचउपयोग करून आपल्या जीवनात जास्तीत जास्त चांगले 3

कार्य करण्याची प्रेरणा कवीने पणतीच्या प्रतिकातून व्यक्त केली आहे.

## विभाग ४ – भाषाभ्यास

उ.४ **(अ) भाषाभ्यासावर आधारित कृती**

(i) **समास** 2

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | दररोज | प्रत्येक रोजी (दिवशी) | अव्ययीभाव समास |
| (ii) | नवरात्र | नऊ रात्रींचा समूह | द्विगू समास |

(ii) **अलंकार** 2

खालील उदाहरण वाचून कृती करा.

मेघासम तो श्याम सावळा

| उपमेय | उपमान | साम्यवाचक शब्द | समान धर्म |
|---|---|---|---|
| शाम | मेघ | सम | सावळा |

(iii) **वाक्यरूपांतर** 2

**तक्ता पूर्ण करा.**

| वाक्य | वाक्याचा प्रकार | प्रकार बदला |
|---|---|---|
| १. कर तुला काय करायचे ते. | आज्ञार्थी वाक्य | तुला काहीही करायची मोकळी आहे. |
| २. पांढरा ढग वरवर जात होता. | होकारार्थी वाक्य | पांढरा ढग खालीखाली येत नव्हता. |

| | | |
|---|---|---|
| (iv) | **सामान्यरूप**<br>**अधोरेखित शब्दांचे सामान्यरूप व विभक्ती प्रत्यय लिहून तक्ता पूर्ण करा.** | 2 |

| शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय |
|---|---|---|
| १. टोकांना | टोकां | ना |
| २. कोळश्याच्या | कोळश्या | च्या |

| | | |
|---|---|---|
| (v) | **वाक्प्रचार**<br>**खालील कंसातील वाक्प्रचारांचा उपयोग करून वाक्ये पुन्हा लिहा.**<br>१. मोठ्या सुट्टीत हस्ताक्षर सुधारण्याची मी **खूणगाठ बांधली.**<br>२. आजीला घरी आलेले पाहून इराचा **आनंद गगनात मावेनासा झाला.** | 2 |
| उ.४ | **(आ) भाषासौंदर्य.** | |
| (१) | **शब्दसंपत्ती** | 1 |
| (i) | **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.**<br>(अ) साखर घालून तयार केलेला भात - [साखरभात]<br>(आ)केलेल्या उपकारांची जाण ठेवणारा - [कृतज्ञ] | |
| (ii) | **विरुद्धार्थी शब्द लिहा.**<br>(अ) पूर्ण × [अपूर्ण]    (आ) अमृत × [विष] | 1 |
| (iii) | **एका शब्दाचे भिन्न अर्थ लिहा.**<br>[दुकानदार] ← वाणी → [बोलणे /वाचा] | 1 |
| (iv) | **खालील शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा.**<br>आगगाडीतून - आग, गाडी, गडी,आतून, गाडीतून | 1 |
| (२) | **लेखननियमांनुसार लेखन**<br>**(i) अचूक शब्द ओळखून लिहा.**<br>(अ) व्यासपीठ<br>(आ) आदिवासी | 1 |
| | (ii) **खालील वाक्य लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.**<br>तो शालीन कवी मनापासून हसला. | 1 |

(३) **विरामचिन्हे**

**खालील वाक्यातील विरामचिन्हे शोधून त्यांची नावे लिहा.** 2

मी म्हटले, ''बाबा, तुम्ही मला ओळखले ?''

| विरामचिन्हे | नावे |
|---|---|
| , | स्वल्पविराम |
| '' - '' | दुहेरी अवतरण चिन्ह |
| ? | प्रश्नचिन्ह |

(४) **पारिभाषिक शब्द**

**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.** 1

१. Index - अनुक्रमणिका

२. Drama - नाटक

(५) **भाषिक खेळ**

**खालील शब्द अकारविल्हेनुसार लावा.** 1

घणघणली, तणतणली ,दणदणली, रणरणली

## विभाग ५ – उपयोजित लेखन

उ.५ **अ. खालील कृती सोडवा.**

(१) **पत्रलेखन**

(i) दिनांक : ५ जून, २०१८ 5

प्रति,
मा. व्यस्थापक
हिरवाई ट्रस्ट,
बालोद्यान मार्ग,
तळेगाव, दाभाडे.

विषय : शाळेतील उद्यानासाठी रोपांची मागणी.

माननीय महोदय,

सप्रेम नमस्कार,

मी अ.ब.क. ज्ञानेश्वरी विद्यालय या शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मुख्याध्यापकांच्या परवानगीने हे पत्र लिहित आहे. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आपण मोफत रोपांचे वाटप करत आहात हे कळले.त्याबद्दल तुमचे खास अभिनंदन. प्रतिवर्षी आमचीही शाळा विविध उपक्रम राबवते. या वर्षी आम्ही शाळेच्या सुरुवातीलाच (५ जून) जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून शाळेच्या उद्यानात रोपे लावण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठीचे सर्व नियोजन आम्ही आमच्या मुख्याध्यापक व गुरुजनांच्या

मार्गदर्शनाखाली केले आहे. आम्हांला काही रोपांची आवश्यकता आहे. त्याची यादी मी खाली देत आहे.

**रोपांची यादी**

| क्र. | रोपे | संख्या |
|---|---|---|
| १ | गुलाब | ३० |
| २ | मोगरा | २० |
| ३ | शोभेची झाडे | २० |
| ४ | शेवंती | २० |
| ५ | लिली | १० |

शाळेतील उद्यानासाठी ही रोपे हवी आहेत. आपण ती लवकरात लवकर पाठवावीत ही विनंती.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व,

आपला कृपाभिलाषी,
अ.ब. क.

विद्यार्थी प्रतिनिधी,
ज्ञानेश्वर विद्यालय,
गोकर्ण पथ, औंध.

(ii) दिनांक : २५ जून, २०१८ 5

प्रति,
माननीय व्यस्थापक
हिरवाई ट्रस्ट,
बालोद्यान मार्ग,
तळेगाव, दाभाडे.

विषय : आपण राबवलेल्या चांगल्या उपक्रमाबाबत अभिनंदन.

माननीय महोदय,

सप्रेम नमस्कार.

'हिरवाई' ट्रस्ट आपले त्रिवार अभिनंदन ! अभिनंदन !! अभिनंदन !!!

दिनांक ५ जून 'जागतिक पर्यावरण दिन' या दिवसाचे औचित्य साधून आपण आपल्या ट्रस्ट कडून 'झाडे लावा..... झाडे जगवा' या बीद्र वाक्याचे पालन करत आपले शहर व शहराबाहेर विविध खेडेगावात मोफत रोपांचे वाटप केले. लोकांना पर्यावरणाचे मोल समजून सांगून आज पर्यावरणाचा समतोल कसा साधावा ? याची माहिती देऊन आजच्या काळात झाडे लावणे का आवश्यक आहे हे पटून दिले लोकांना झाडे लावण्यास प्रोत्साहित केले.

या आपल्या पर्यावरणाच्या जागृतीबाबत व अशा प्रकारच्या राबवलेल्या कार्यक्रमाबाबत मी अ.ब.क.

| | | |
|---|---|---|
| | ज्ञानेश्वर विद्यालय या शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून आपले अभिनंदन करण्यासाठी हे पत्र आपणास लिहित आहे. असेच विविध सामाजिक उपक्रम आपल्या हातून पूर्ण होवोत ही सदिच्छा.<br>कळावे, तसदीबद्दल क्षमस्व,<br>आपला नम्र,<br>अ.ब.क.<br>विद्यार्थी प्रतिनिधी,<br>ज्ञानेश्वर विद्यालय,<br>गोकर्ण पथ, औंध. | |
| (२) | **सारांश लेखन**<br>**खालील उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**<br>सगळी मनुष्यजात एक आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व यांच्या पायावर उभे असलेले कुटुंब निर्माण करणे हे मनुष्यत्वाचे ध्येय आहे. शेतकी, कला-कौशल्य, मजुरी अशा कामांमुळे मनुष्याला थोरपणा येतो. या कामांमधूनच सृष्टीचा स्वर्ग आपण बनवू शकतो. आपल्या अस्तित्वाकरता किंवा जगण्याकरता वस्तू उत्पन्न करणे किंवा मिळवणे त्यासाठी एकमेकांना सहकार्य करणे हाच मनुष्याचा श्रेष्ठ धर्म असून तीच ईश्वरपूजा आहे. | 5 |
| उ.५ | **आ. खालील कृती सोडवा.** | |
| (१) | **बातमी लेखन**<br>**आमच्या वार्ताहराकडून** **दिनांक : २ मार्च, २०१७**<br>**सर्व शिक्षा अभियान - हितगुज मेळावा**<br>ठाणे - सर्व शिक्षा अभियान, शिक्षण विभाग ठाणे यांच्या वतीने ठाणे येथील सरस्वती महाविद्यालयाच्या भव्य पटांगणात जागतिक महिला आरोग्य दिनाच्या निमित्ताने दिनांक २७ फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधीत सर्व शाळातील इयत्ता ८ वी ते १० वीत शिकणाऱ्या विद्यार्थिनींसाठी 'आरोग्य, स्वच्छता व हितगुज मेळाव्याचे' आयोजन केले होते. तीन दिवस चाललेल्या या मेळाव्याचे उद्घाटन ठाणे तालुक्याचे आमदार बाळासाहेब देखणे यांनी केले.<br>तीन दिवस चाललेल्या या मेळाव्यात कुशल व नामवंत डॉक्टरांनी विद्यार्थिनीना मार्गदर्शन केले. किशोरवयीन मुलींचे व्यक्तिमत्त्व विकास, आहार, आरोग्य तसेच वैयक्तिक स्वच्छता, निरोगी शरीर, मन:शांती, योग, हलके व सहज करता येणारे व्यायाम, चांगल्या सवयी व नियमितपणाचे महत्त्व या विषयांवर तज्ज्ञ डॉक्टरांनी उचित मार्गदर्शन केले. मेळाव्यात सहभागी विद्यार्थिनींची रक्त तपासणीही करण्यात आली. अनेक स्पर्धांचे व मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आले. स्पर्धेतील विद्यार्थिनींचा सहभाग व उत्साह लक्षवेधी होता. भोजन व निवासाची उत्तम सोय करण्यात आली होती.<br>मेळाव्याच्या शेवटच्या दिवशी स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना बक्षीसे व प्रमाणपत्र देण्यात आली. सुप्रसिद्ध लेखिका सौ. स्वप्नाली कर्णिक यांनी सर्वांचे आभार मानले व विद्यार्थिनींचे कौतुक करून | 6 |

| | | |
|---|---|---|
| | आरोग्याची काळजी घेण्याबाबत सूचनाही दिल्या. तसेच त्यांनी शिक्षण विभागाच्या या चांगल्या कार्याचे तोंड भरून कौतुक करून सर्वांचे आभार मानले. उत्साहात, आनंदात व जोशात या कार्यक्रमाची सांगता झाली. | |
| (२) | **कथा लेखन**<br>**खालील अपूर्ण कथा पूर्ण करून लिहा.**<br><br>**लोभी माणूस**<br>रामपूर गावामध्ये सोहनलाल नावाचा एक सावकार राहत होता. तो अतिशय लोभी होता. सोन्याची तर त्याला विशेष आवड होती.<br>एके दिवशी गावात एका साधूचे प्रवचन होते. प्रवचनात साधुमहाराजांनी सांगितले की, ''आपण जर मनापासून परमेश्वराची भक्ती केली तर परमेश्वर आपल्या सर्व इच्छा पूर्ण करतो.'' सोहनलाल हे ऐकून खूपच खूष झाला. त्या दिवसापासूनच परमेश्वराची भक्ती करू लागला. दिवस रात्र अगदी मनापासून परमेश्वराच्या भक्तीत तो रंगून जाऊ लागला असे बरेच दिवस निघून गेले.<br>याची भक्ती पाहून एके दिवशी परमेश्वर त्याच्यावर प्रसन्न झाला. परमेश्वराने त्याला दर्शन दिले आणि सांगितले, ''माग तुला काय हवे ते ?'' परमेश्वराचे हे शब्द ऐकताच सोहनलालचा लोभीपणा जागृत झाला. आणि तो परमेश्वराला म्हणाला, ''माझ्या झोळीत भरपूर सोन्याची नाणी टाक''. परमेश्वराने त्याची मागणी मान्य करताना त्यास सांगितले, ''नाणी जर जमिनीवर पडली तर त्याची माती होईल.'' लोभीपणामुळे सोहनलालने त्याकडे लक्ष दिले नाही.<br>परमेश्वर सोहनलालच्या झोळीत सोन्याची नाणी टाकू लागला. हळूहळू संपूर्ण झोळी सोन्याच्या नाण्यांनी भरून गेली. तरीही सोहनलाल देवाला 'मला अजून सोन्याची नाणी दे', असे सांगत होता आणि अचानक सोन्याची नाणी झोळीत जास्त झाल्याने झोळी फाटली आणि सर्व नाणी जमिनीवर पडून त्यांची माती झाली. हे पाहताच सोहनलालला अतिशय दु:ख झाले आणि त्याचवेळेला परमेश्वरही अंतर्धान पावले. | 6 |
| उ.५<br>(१) | **इ. लेखनकौशल्य**<br>**मी अनुभवलेला व पाहिलेला 'अब्दुलचा सत्कार समारंभ'**<br>**दिव्यत्वाची जेथ प्रचिती।**<br>**तेथे कर माझे जुळती ।।**<br><br>'अब्दुलला ओळखणाऱ्या प्रत्येकाला त्याच्याबद्दल एक आदराची व आपुलकीची भावना वाटते. खरं तर, या विभागात तो 'चुडीवाला' म्हणूनच अधिक प्रसिद्ध आहे. समाजातील अनेक प्रकारच्या भेदभावामुळे आपण आपले वैरी झालो आहोत. कुटुंबाच्या मर्यादेत आपल्या सुखदु:खाचे विश्व फारच मर्यादित झाले आहे. पण या मर्यादा ओलांडून समाजसेवेचे व्रत घेतलेली काही माणसे असतात. त्यापैकी एक होता अब्दुल मियाँ. त्या दिवशी ते आमच्या घरी आले ते सत्काराचे निमंत्रण देण्यास. मी नक्की उपस्थित राहाण्याचे आश्वासन त्यांना दिले. | 8 |

मी व माझी ताई वेळेवर कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहोचलो होतो. ज्येष्ठ समाजसेवा मंडळातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या मंडळातर्फे समाजातील दहा श्रेष्ठ समाजसेवकांचा सत्कार होणार होता. एक अब्दुलमियाँही होते. कार्यक्रमाच्या ठिकाणी नेहमीप्रमाणेच आवाज, गडबड, गोंधळ होता. व्यासपिठावर एक भलामोठा फलक लावण्यात आला होता. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे व सत्कारमूर्ती उपस्थित होते.

स्वागत पद्य, ईशस्तवन, पाहुण्यांचा परिचय व कार्यक्रमाचे उद्दिष्ट सांगून मुख्य कार्यक्रम सुरु झाला.

मला जाणून घ्यावयाचे होते की, अब्दुलमियाँने कोणती मोठी समाजसेवा केली म्हणून आज त्यांचा सत्कार व गौरव केला जाणार आहे. प्रत्येक सत्कारमूर्तीला मनोगतही व्यक्त करायचे होते. कार्यक्रम खरोखर चांगला होता. समाजसेवेच्या रुपाने समाजऋण व माणुसकीचे दर्शन घडविणाऱ्याच्या कार्याचे कौतुक करून इतरांना समाजसेवेची प्रेरणा देणे हाच मुख्य उद्देश होता.

अब्दुलमियाँच्या नावाची घोषणा झाली. मी कान टवकारले. त्यांच्याविषयी काय सांगतात हे मला ऐकावयाचे होते.

परिचयकर्ता सांगू लागला - ‘अब्दुलमियाँ’ ज्यांना आपण ‘चुडीवाला’ या नावानेही ओळखतो. ते एका गरीब कुटुंबात जन्मले. सात भावंडात ते सर्वात लहान. शिक्षण झालेच नाही कारण गरिबी. बांगड्या विकणे हाच व्यवसाय. हातावरच पोटाचा भार. पण दादासाहेब पटवर्धन यांच्या सहवासाने त्यांनी समाजसेवा सुरु केली. कुष्ठरोगी महिलांना बांगड्या भरण्यास कोणताही बांगडीवाला तयार नव्हता. आम्हांला तुमचे पैसे व संपर्कही नको म्हणून बांगडीवाले कुष्ठरोगी महिलांना टाळत होते. पण अब्दुलमियाँनी मात्र स्वत:हून इथे येण्याचे व माय-भगिनींना मोफत बांगड्या भरण्याचे कार्य आजतागायत सुरू ठेवले आहे. या त्यांच्या कार्यामुळे कुष्ठरोगी महिलांच्या जीवनात आनंदाचा वर्षाव ते करतात. तसेच नगरपालिकेच्या ‘बालक-माता आरोग्य योजने’च्या कार्यक्रमातही ते सहभागी होतात. ते सुद्धा कुठल्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता. त्यांचे हेच समाजकार्य व मानवसेवा अनमोल आहे. म्हणून ही संस्था त्यांचा सत्कार व गौरव करीत आहे. या कार्यात त्यांच्या कुटुंबियांचीही त्यांना मोलाची साथ मिळते. अब्दुलमियाँनी केवळ धन्यवाद एवढे शब्द उच्चारून अभिवादन केले.

असा हा अनोखा, आगळा वेगळा सत्कार सोहळा मी अनुभवला जो अत्यंत प्रेरणादायी आहे.

(२) **पिंजऱ्यातील पोपटाचे आत्मवृत्त** ४

‘‘मित्रा, मी पिंजऱ्यातला पोपट बोलतो आहे. मी या पिंजऱ्यात दु:खी कष्टी जीवन जगत आहे. आता मला हे जीवन नकोसे झाले आहे. काय हे माझं दुर्भाग्य ! माझ्या स्वप्नातदेखील असा विचार आला नाही की, मला पिंजऱ्यात बंदिस्त व्हावे लागेल. या पिंजऱ्यात मला मधुर फळे खायला मिळतात. घरातील सर्वजण माझे कौतुक करतात. पण मला कोणीही पिंजऱ्यातून बाहेर काढत नाही. आजही मला माझे पूर्वीचे स्वातंत्र्याचे दिवस आठवतात आणि असे हरवून गेलेले आनंदाचे क्षण परत माझ्या जीवनात कधी येणार, या विचाराने माझे मन व्याकूळ होते.

बालपणी मी किती सुखात होतो ! अतिशय निसर्गरम्य असे ते जंगल होते. त्या जंगलातील एका झाडावरील ढोलीत माझा जन्म झाला. त्या ढोलीतून मी प्रथम बाहेर पाहिले तेव्हा आसपासचा नयनरम्य देखावा पाहून मला किती आनंद झाला होता! पुढे माझ्या पंखात बळ आल्यावर आईवडिलांनी मला निळ्या

आकाशात उडायला शिकविले. जंगलातील झाडांवर मी आईवडिलांसमवेत स्वच्छंदपणे विहार करीत असे. कधी या झाडावर तर कधी त्या झाडावर. दिवस उजाडला की मी बाहेर पडत असे. आईवडिलांबरोबर राहिल्यावर मी समवयस्क मित्रांबरोबर रमू लागलो. त्यावेळी तासन् तास जगातल्या सर्व दु:खांपासून दूर आकाशात फिरायचो. मी माझे पंख पसरवून अशी काही भरारी आकाशात घ्यायचो जणू काही मीच इथला 'राजा' आहे. झाडांच्या डहाळ्यांवर खेळायचो, बागडायचो. मधुर गाणी गायचो. शेतातील धान्याच्या कणसातील दाणे टिपायचो. जंगलातील झाडांची फळे मनसोक्त खायचो. विशेषत: पेरूच्या झाडांची ! मग हिरव्यागार झाडांच्या सानिध्यात गाढ झोपयचो. रात्रीच्या वेळी झोप आली नाही तर आकाशातील चंद्र व चांदण्या यांचा लपंडाव पाहत राहायचो. असे होते ते मस्त जीवन ! पण माझ्या वाट्याला फारच थोडे दिवस ते सुख आले.

एके दिवशी मी जमिनीवरील दाणे टिपत असताना कसा कोण जाणे माझा पाय जाळ्यात अडकला. मी ओरडू लागलो; पण माझे सोबती माझ्या मदतीला न येता उडून गेले. मी फासेपारध्याच्या हाती सापडलो त्याच्याजवळ इतरही पुष्कळ पक्षी होते. फासेपारध्याने मला एका श्रीमंत माणसाच्या हाती विकले. माझ्या सुंदरतेवर खुश होऊन त्या श्रीमंत माणसाने फासेपारध्याला भरपूर पैसे दिले.

तेव्हापासून मी हे गुलामगिरीचे जीवन जगतोय. माझ्या मालकाने मला सोनेरी पिंजऱ्यात बंदिस्त केले आहे. त्याने दिलेली फळे गोड मानून खातो. लहान मुले मला खेळणं समजून माझ्या सभोवती घेराव घालतात आणि काही ना काही खाऊ घालण्याचा प्रयत्न करतात. स्वातंत्र्य हिरावून घेतल्याचं दु:ख त्यांना काय समजणार !

तरीपण लोकांना आनंद देण्यासाठी खोटं हास्य चेहऱ्यावर आणतो. मनात नसतानाही इतरांना रमविण्यासाठी मला शीळ घालावी लागते. माझ्या बंदिस्त जीवनाची व्यथा फक्त तेच समजू शकतात, ज्यांनी असे बंदिस्त जीवन व्यतीत केले आहे. येथे माझ्यापासून माझं आयुष्य हिरावून घेतलं जात आहे. इतकेच नव्हे, तर माझी भाषाही हिरावून घेतली जात आहे. या घरातील व्यक्तींनी शिकवल्याप्रमाणे मी 'सुस्वागतम्', 'नमस्ते', 'राम राम', 'कृष्ण कृष्ण', 'मिठू मिठू' बोलतो. माझ्या मालकाला 'आत्माराम' अशी हाक मारतो. हे खरं आहे, की घरातल्या सर्वांना मी प्रिय आहे, पण तुम्ही अशा प्रेमाला काय म्हणणार ?

'घर कसले ही तर कारा
विष समान मोती चारा
प्रेमाचे बंधन द्वारा
मज अडवितो हा उंबरा'

मला येथे भरपूर खायला मिळते, तरीही मी इथे दु:खी आहे. या गुलामीच्या जीवनामुळे मी त्रस्त झालोय. भूतकाळातल्या रंगतदार आठवणी माझ्या दु:खात अजून भर घालतात. खूप वेळा स्वत:ला संपवण्याचा प्रयत्न केला पण या घरातल्या व्यक्ती मला इतक्या लाड प्रेमाने वागवतात, की जगायला भाग पडावे लागते. सतत मी इतरांचे मनोरंजन करीत आहे. पण मग माझ्या भवितव्याचे काय ? मुक्तपणे फिरण्याचे भाग्य मला कधी लाभेल का ? मित्रा, पुन्हा केव्हा भेटू हे सांगता येणार नाही. मी माझ्या मालकाबरोबर परदेशी जात आहे. मला नेहमी एक प्रश्न पडतो की, स्वत:च्या स्वातंत्र्याबाबत जागृत असणारी ही माणसे उडण्याच्या आमच्या जन्मसिद्ध हक्कांवर पांघरूण घालून आम्हांला बंधनात का टाकतात ?

❖❖❖❖❖